# यंदा महाराष्ट्र दिन साधेपणाने होणार

**मुंबई : पुढारी वृत्तसेवा**

राज्यात कोरोनाची दुसरी लाट तीव्र झाल्याने यंदाचा ६१ वा महाराष्ट्र दिन साधेपणाने साजरा करण्यात येणार आहे. महाराष्ट्र दिनाच्या निमित्ताने कवायती अथवा संचलनाचे आयोजन करण्यात येऊ नये, असे परिपत्रक सामान्य प्रशासन विभागाच्या राजशिष्टाचार शाखेने जारी केले आहे.

शनिवारी समारंभ आयोजित करताना सुरक्षित वावर आणि कोरोनासंबंधी इतर सर्व नियमाचे काटेकोर पालन करण्यात यावे. सर्वांसाठी मास्क बंधनकारक राहील असे परिपत्रकात म्हटले आहे. जिल्हा मुख्यालयात केवळ एकाच ठिकाणी सकाळी ८ वाजता फक्त ध्वजारोहण करण्यात यावे. विभागीय मुख्यालयाच्या ठिकाणी विभागीय आयुक्तांनी ध्वजारोहण समारंभाकरिता योग्य ती व्यवस्था करावी. अशा सूचना देण्यात आल्या आहेत.


तरुण भारत

# ऑनलाईन शिक्षण ; पण प्रात्यक्षिकापासून वंचित

अहिल्या परकाळे
कोल्हापूर

प्रात्यक्षिकांच्या आधारे केलेल्या दर्जेदार संशोधनावर एखादा नामवंत अभियंता घडत असतो. अशा अभियंत्यांना नामवंत कंपन्या नोकरीची संधी देतात. त्यामुळे अभियांत्रिकीचे विद्यार्थी रात्रंदिवस कष्ट करून उपकरण बनवत असतात. प्रात्यक्षिक ज्ञान घेण्यावर त्यांचा भर असतो. मात्र यंदा ऑनलाईन शिक्षणाशिवाय प्रॅक्टीकलसह अन्य उपक्रम करण्याची संधीच मिळाली नाही. प्रत्यक्ष प्रॅक्टीकल न करता विद्यार्थी कोणत्या ज्ञानाची शिदोरी घेऊन कॉलेजमधून बाहेर पडणार, भावी अभियंते कसे बनणार, असा सवाल शिक्षणतज्ज्ञांकडून उपस्थित होत आहे.

अभियांत्रिकीच्या ८० टक्के विषयांना प्रॅक्टिकल असते. काही प्रॅक्टिकल हे मशीनवर केल्याशिवाय विद्यार्थ्यांना समजत नाहीत. प्रत्यक्ष मशीनवर काम करताना उपकरणाचे विविध पैलू प्रत्यक्ष हाताळायला मिळतात. त्याचबरोबर वर्कशॉपसारख्या प्रॅक्टिकलच्या माध्यमातून त्यांचे कौशल्य विकसित होत असते. उत्तम अभियंता होण्यासाठी प्रॅक्टिकल ज्ञानाशिवाय दुसरा पर्याय नाही. याच प्रॅक्टीकलच्या आधारे विद्यार्थ्यांच्या मौखिक परीक्षा होत असतात. परंतु कोरोनामुळे



- अभियांत्रिकीचे विद्यार्थी कौशल्यपूर्ण कसे घडणार
- व्हर्च्युअल लॅबमध्ये मोजकेच प्रयोग

गेल्या वर्षापासून अभियांत्रिकी विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष प्रॅक्टिकल करता आलेले नाहीत. व्हर्च्युअल लॅबच्या माध्यमातून मोजकेच प्रयोग विद्यार्थ्यांनी केले आहेत. मात्र कोरोनामुळे प्रत्यक्ष विद्यार्थ्यांचा कौशल्य विकास व्हायला संधीच दिली जात नाही. यात अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांचे नुकसान होत आहे.

### अभियांत्रिकी विद्यार्थ्यांचे तोटे

विद्यार्थ्यांची निरीक्षण क्षमता, मशीन वापरण्याचे कौशल्य, सामूहिक प्रोजेक्टपासून विद्यार्थी दूर.

मशीन वापरण्याचे कौशल्य विद्यार्थ्यांना अवगत झालेले नाही.

### सिम्युलेशन, मॉडेलिंग ॲपनुसार प्रात्यक्षिक...



अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांना गतवर्षीपासून एकही प्रत्यक्ष प्रॅक्टीकल करता आलेले नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांना भवितव्याची चिंता आहे यात प्रश्न नाही. परंतु कोरोना काळात सिम्युलेशन आणि मॉडेलिंग ॲपच्या माध्यमातून प्रॅक्टीकल शिकवली जातात. यात प्रॅक्टीकलचे काम ७५ टक्के पूर्ण होते.

डॉ. आर. के. कामत (अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा)

लोकसत्ता

# शिवाजी विद्यापीठात २९ हजार विद्यार्थ्यांची ऑनलाइन परीक्षा

लोकसत्ता प्रतिनिधी

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील विविध प्रकारच्या विद्याशाखांच्या २९ हजार ५६३ विद्यार्थ्यांनी गुरुवारी ऑनलाइन परीक्षा दिली. ४७७७ विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष परीक्षा दिली.

विद्यापीठाच्या हिवाळी सत्रातील परीक्षा २२ मार्चपासून सुरू झाल्या आहेत. या परीक्षा ऑनलाइन व ऑफलाइन पद्धतीने घेतल्या जात आहेत. गुरुवारी २५ विद्याशाखांच्या परीक्षा पार पडल्या. त्याला ३० हजार ३१० विद्यार्थ्यांपैकी २९ हजार ५६३ विद्यार्थ्यांनी ऑनलाइन परीक्षा दिली. विद्यार्थ्यांना उद्भवणाऱ्या तांत्रिक अडचणीचे निराकरण विविध माध्यमातून करण्यासाठी विद्यापीठ तसेच सॉफ्टवेअर पुरवठा कंपनी यंत्रणा कार्यरत होती.

# २२ हजार विद्यार्थ्यांनी दिली ऑनलाईन परीक्षा

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या हिवाळी सत्रातील ऑक्टोबर-नोव्हेंबर २०२० च्या परीक्षेंतर्गत गुरुवारी २२ हजार ७२१ विद्यार्थ्यांपैकी २२ हजार २४५ विद्यार्थ्यांनी ऑनलाईन पद्धतीने परीक्षा दिली. विद्यापीठ परीक्षांना मार्च महिन्यापासून सुरुवात झाली आहे. राज्य सरकारच्या मार्गदर्शक सूचनांनुसार सध्या ऑनलाईन पद्धतीने परीक्षा घेण्यात येत आहेत. गुरुवारी बी.एससी.- बायोटेक, बीसीएस, बीबीए, बीसीए, बीआयडी, बीडीएफसी, बी.ए., बी.एससी., एमए., एम.एससी., एम.लिब. आदी अभ्यासक्रमांच्या परीक्षा व्यवस्थित झाल्याची माहिती परीक्षा विभागाच्या वतीने देण्यात आली.


## जाहीर नोटीस

तमाम लोकांना कळविणेत येते की, मिळकतीचे वर्णन :- **मौजे चिंचवाड, ता. करवीर, जि.कोल्हापूर येथील गट.क्र. ६७१/ब याचे ७/१२ प्रमाणे एकूण क्षेत्र हे. ०-६० आर.आकार रु ७-४७ पैसे. यापैकी क्षेत्र हे.०-१० आर मिळकत यासी चर्तु:सिमा:-पूर्वेस :-सलगर यांची मिळकत, पश्चिमेस :- चौगुले यांची मिळकत, दक्षिणेस :- कोळी यांची मिळकत, उत्तरेस :- बोधे यांची मिळकत.** येणेप्रमाणे चर्तु:सिमेतील मिळकत सदर जाहीर

तरूण भारत

# विद्यापीठ परीक्षा सुरळीत

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठअंतर्गत गुरुवारी झालेल्या पदवी व पदव्युत्तरच्या ऑनलाईन परीक्षा सुरळीत झाल्या. या परीक्षेसाठी २२ हजार ७२१ विद्यार्थ्यांनी अर्ज भरला होता. त्यापैकी २२ हजार २४५ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. यामध्ये बी. एस्सी-बायोटेक, बी.एस्सी. आयटी, बी. एस्सी. शुगर टेक, बी. एस्सी. फुड प्रोसेसिंग अॅन्ड पॅक, बी. एस्सी कॉम्प्युटर सायन्स, बी. एस्सी., बी. बी. ए., बी. सी. ए., बी. एस्स. डब्ल्यू, बी. आय. डी., बी. डी. एफ. सी., बी. एफ. टी. एम., बी. होक., एम. ए., बी. डी. एस., एम. लिप., एम. एस. डब्ल्यू, एम. कॉम., मास्टर ऑफ व्हॅल्युएशन, एम. सी. ए., एम. एस्सी. नॅनो सायन्स अॅन्ड टेक्नॉलॉजी, एम. ए./ एम. एस्सी. भुगोल, एम. एस्सी., बी. एस्सी., बी.ए. या अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांचा समावेश आहे.